केसरी
पुणे, ११ जानेवारी २०१८

# विद्यार्थ्यांना घडली अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर



पुणे : पंख सामाजिक संस्था आणि क्विकहील फौंडेशनच्या शाळांगण उपक्रमाअंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांना नुकतीच एरंडवणे अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर घडविण्यात आली.

अग्नि नियंत्रित असेल तर देवता, अनियंत्रित झाला तर अक्राळविक्राळ राक्षस...आग लागते म्हणजे वैज्ञानिक घटना नक्की काय घडते, आगीच्या बंबाला पाचारण कसे करायचे, अग्निशमन विभागाचा दूरध्वनी क्रमांक काय?... आग विझवण्यासाठी बंबातून पाण्याचे फवारे कसे मारले जातात? विद्यार्थ्यांना पडलेल्या या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अग्निशमन अधिकारी गजानन पाथ्रुडकर यांनी दिली. पंख सामाजिक संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे आणि स्नेहल पाटील, तसेच मुख्याध्यापिका शारदा शेटे यावेळी उपस्थित होत्या. आग लागू नये म्हणून आणि लागल्यास आपली सुजाण नागरिक म्हणून भूमिका कशी निभवायची, मनाचा समतोल राखून प्रसंगी तोंड कसे द्यायचे याचे सप्रयोग धडे देण्यात आले. या कार्यक्रमात एरंडवणे केंद्रातील अग्निशमन जवानांनी सहभाग घेतला. अग्निशमन दलाकडील वायरलेस अधिकारी वासुदेव एकबोटे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.